## <u>प्रेसनोट</u> दि. २५/१०/२०२४

### ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील पाणिपुरवठा व जलनिसारण विभागाचे तत्कालिन लेखाधिकारी यांचेवर ज्ञात उत्पनापेक्षा जास्त मालमत्ता बाळगले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक व कलम | वाकड पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. ११५१/२०२४, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम १३ (१)(ई) सह १३ (२) सह भारतीय दंड संहिता कलम १०९ प्रमाणे. |
| तक्रारदार / फिर्यादी | श्रीमती माधुरी चंद्रकांत भासले, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे पथक. |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्री. किशोर बाबुराव शिंगे, तत्कालिन लेखाधिकारी, पाणिपुरवठा व जलनिसारण विभाग, पिंपरी-चिंचवड मनपा, पुणे (वर्ग-२). (सध्या - सेवानिवृत्त)<br>२) सौ. भाग्यश्री किशोर शिंगे (पत्नी) |
| अपसंपदा निष्पन्न रक्कम | ५६,४०,२६४/- रुपये (कायदेशीर ज्ञात उत्पन्नापेक्षा जास्त १०२.६९% ) |
| गुन्हा दाखल दिनांक | २५/१०/२०२४ रोजी. |

थोडक्यात माहिती :- यातील लोकसेवक श्री. किशोर बाबुराव शिंगे, तत्कालिन लेखाधिकारी, पाणिपुरवठा व जलनिसारण विभाग, पिंपरी-चिंचवड मनपा, पुणे (वर्ग-२) (सध्या-सेवानिवृत्त) यांनी दि. १८/१२/१९८७ ते दि. ३१/०७/२०१७ या परिक्षण कालावधीत संपादीत केलेल्या अपसंपदेबाबत त्यांना पुरेशी व वाजवी संधी देऊन सुद्धा ते समाधानकारकरित्या स्पष्टीकरण / हिशोब देवू शकले नाहीत. तसेच त्यांनी संपादित केलेली मालमत्ता त्यांचे ज्ञात स्त्रोताच्या उत्पन्नाच्या प्रमाणाशी विसंगत असल्याने लोकसेवक श्री. किशोर बाबुराव शिंगे यांनी ५०,४०,२६४/- रुपये (१०२.६९%) इतकी अपसंपदा भ्रष्ट मार्गाने धारण करुन उद्देश पुर्वक स्वतःला व त्यांच्या पत्नीला अनुचितपणे अवैधरित्या समृद्ध केले असून, त्यास पत्नी सौ. भाग्यश्री किशोर शिंगे यांनी त्यांना अपप्रेरणा दिली आहे. सदरची मालमत्ता ही भ्रष्ट मार्गाने धारण केलेली अपसंपदा असून ती त्यांच्या लोकसेवक सेवा कालावधीतील वैध उत्पन्नापेक्षा अधिक असल्याचे निष्पन्न झाले आहे. म्हणून त्यांचेविरुद्ध वरीलप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास श्री. दयानंद गावडे, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. पुणे करत आहेत.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in



दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.